admn 19-20


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३३१९/ १८५२/२०१९ दि.०९ ऑगस्ट,२०१९

## परिपत्रक

**विषयः- कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचे सुधारीत वेळापत्रक.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया दि. ३०/७/२०१९ पासून सुरु झालेली आहे. नियोजित वेळापत्रकानुसार दि.९/८/२०१९ पर्यंत उमेदवारांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करावयाचे आहेत. तथापि, सध्या राज्यातील पूरपरिस्थितीमुळे कागदपत्रे प्राप्त करण्यास उमेदवारांना अडचणी येत असल्याच्या तक्रारी या कार्यालयाकडे प्राप्त होत असून ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याची मुदत वाढविण्याविषयीची मागणी होत आहे.

ही बाब विचारात घेता, सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेंतर्गत ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत दि. १९/८/२०१९ पर्यंत वाढविण्यात येत आहे. यानुसार वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रम | सध्याचा दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १. | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | ०९/०८/२०१९ | १९/०८/२०१९ |
| २. | 'केटीपीएल' व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | १६/०८/२०१९ (सायंकाळनंतर) | २३/०८/२०१९ (सायंकाळनंतर) |
| ३. | तक्रार नोंदणीचा कालावधी | १७/०८/२०१९ ते १९/०८/२०१९ | २५/०८/२०१९ ते २७/०८/२०१९ |
| ४. | 'केटीपीएल' व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | २४/०८/२०१९ (सायंकाळनंतर) | ३१/०८/२०१९ (सायंकाळनंतर) |
| ५. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | २८/०८/२०१९ (सायंकाळनंतर) | ०५/०९/२०१९ (सायंकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | २९/०८/२०१९ ते ३१/०८/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) | ०६ व ०७/०९/२०१९ आणि ०९/०९/२०१९ |
| ६. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | ०४/०९/२०१९ (सायंकाळनंतर) | १३/०९/२०१९ (सायंकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | ०५/०९/२०१९ ते ०७/०९/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) | १६/०९/२०१९ ते १८/०९/२०१९ |

Scanned by CamScanner

admn 19-20

| अ. क्र. | कार्यक्रम | सध्याचा दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| ७. | रिक्त जागांच्या यादीची प्रसिध्दी | ०९/०९/२०१९ | २०/०९/२०१९ |
| ८. | **ऑनलाईन महाविद्यालयनिहाय प्रवेश फेरी** (**परिशिष्ट 'एच'** येथील कार्यपध्दतीनुसार) | ११/०९/२०१९ आणि १२/०९/२०१९ | २३/०९/२०१९ आणि २४/०९/२०१९ |
| ९. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | ११/०९/२०१९ | २३/०९/२०१९ |

राष्ट्रीय सुटया वगळता इतर सर्व शासकीय सुटयांच्या कालावधीत प्रवेश प्रक्रिया महाविद्यालयस्तरावर चालू राहील, याबाबत सर्व प्रवेशोच्छुक व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(आर. बी. भागडे भा प्र से)
**महासंचालक**

प्रत कार्यवाहीसाठीः-

१. मे. टेकनिक आयटी सोल्यूशन, लाईफ स्क्वेअर सोसायटी, ए ३०१, लोहगाव, पुणे ४७
यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अपलोड करावे.

२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे
यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक प्रवेशविषयक संकेतस्थळावर अपलोड करावे.

३. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी कृषी विद्यापीठांच्या संकेतस्थळावर सदरचे परिपत्रक अपलोड करावे.

Scanned by CamScanner